**L.A. BILL NO.OF 2015.**

**A BILL**

**TO PROVIDE FOR THE PROHIBITION OF SOCIAL BOYCOT OF A PERSON OR GROUP OF PERSONS INCLUDING THEIR FAMILY MEMBERS, AND FOR MATTERS CONNECTED THETEWITH OR INCIDENTAL.**

**THERETO.**

सन २०१५ चे विधानसभा विधेयक क्रमांक.

महाराष्ट्र जातपंचायत व सामाजिक बहिष्कारास प्रतिबंध अधिनियम २०१५.

ज्याअर्थी, भारताच्या संविधानाच्या उद्देशिकेत इतर ध्येयांबरोबरच नागरीकांमध्ये व्यक्तींच्या प्रतिष्ठेचे आश्वासन देणारी सामाजिक न्याय, समता, बंधूता प्रवर्धित करणे या ध्येयाचाही समावेश केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, संविधानाच्या अनुच्छेद २१ मध्ये व्यक्तीच्या प्रतिष्ठापुर्वक मानवी जीवन जगण्याच्या मुलभूत हक्काचा तसेच, मानवी जिवीत अस्तित्व विषयक जन्मसिध्द मुलभूत मानवी हक्काचा समावेश आहे;

आणि ज्याअर्थी, एखादया व्यक्तीवर किंवा व्यक्तींच्या समूहावर तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांवर सामाजिक बहिष्कार घालण्याची अमानवीय प्रथा बेकायदेशीर समांतर न्यायव्यवस्था इ.राज्याच्या विविध भागांमध्ये अजुनही प्रचलित असल्याने निर्दशनास आले आहे;

आणि ज्याअर्थी, एखादया व्यक्तीवर किंवा व्यक्तींच्या समूहावर तसेच त्यांच्या कुटुंबातील सदस्यांवर सामाजिक बहिष्कार घालण्याच्या व त्यांच्याशी संबधित व तदनुषंगिक बाबींसारख्या दुष्ट प्रथेचे समुळ उच्चाटन करण्यासाठी विद्यमान कायदे पर्याप्त नाहीत असे सिध्द झाले असल्याचे दिसून येते;

**आणि ज्याअर्थी,** कालसुसंगत लोककल्याणाच्या हितासाठी सामाजिक सुधारणेची एक बाब म्हणून जातपंचायतव्दारे करण्यात येणारी कार्यवाही सामाजिक बहिष्कारावर बंदी घालणे आवश्यक आहे;

**आणि ज्याअर्थी,** राज्यातील लोक आपल्या मानवी हक्कांसह सलोख्याने राहातात याची सुनिश्चिती करण्याच्या दुष्टीने, एखादया व्यक्तीवर किंवा व्यक्तींच्या समूहावर तसेच, त्यांच्या कुटुंबातील सदस्यांवर बहिष्कार घालण्यास प्रतिबंध करण्यासाठी आणि त्याच्याशी संबधित किंवा तदनुषंगिक बाबींसाठी तरतुद करणे इष्ट आहे;भारतीय संविधानाच्या तरतुदींनुसार नागरीकत्वाचे अधिकारांचा विनियोग करण्यासाठी आवश्यक, अनुकुल सामाजिक वास्तव निर्माण करण्याची जबाबदारी मानुन त्यासाठी नागरीकांना स्वातंत्र, समता, बंधुता अनुभवता यावी या हेतुने; **त्याअर्थी, भारतीय** गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याव्दारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहेः-

१. (१)याअधिनियमास,महाराष्ट्र सामाजिक बहिष्कार बंदी अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

(२) तो, संपुर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

२. (१) या अधिनियमामध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,-

(क) "जात पंचायत" याचा अर्थ, जी आपल्या समाजातील विविध प्रथांचे विनियमन करण्याचे कोणत्याही सदस्याच्या वैयक्तिक, कौटुंबिक व सामाजिक वर्तणुकीवर अवैधरीत्यानियंत्रण ठेवण्याचे काम करते आणि जी मौखिक किंवा फतवे काढून आपल्या सदस्यांमधील वैयक्तिक व बेकायदेशीरीत्या सामुहिकपणे सोडवते किंवा त्यावर निर्णय करते, मग जिल्हा "पंचायत" किंवा "गावकी" किंवा इतर कोणत्याही नावाने किंवा वर्णणाने संबोधण्यात येवो-अशी कोणत्याही समाजाच्या व्यक्तींच्या समूहाने स्थापन केलेली समिती किंवा मंडळ-मग ते नोंदणीकृत असो किंवा नसो-असा आहे;

(ख) "समाज" याचा अर्थ, ज्या समूहातील सदस्य जन्माने, धर्मातराने किंवा कोणत्याही धार्मिक विधी संस्कार किंवा

समारंभ करण्याने एकाच धर्माचे किंवा पंथाचे असतात तसेच जाती-जमातींचे असतात म्हणून अशा वस्तुस्थितीमुळे ऐकमेकांशी जोडले गेलेले असतात, असा समूह, असा आहे आणि त्यामध्ये एखादया जात-जमातींचा किंवा पोट-जातीचा जमातीचा समावेश होतो;

(ग) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(घ) "मानवी हक्क"या संज्ञेस, मानवी संरक्षण अधिनियम, १९९३.याच्या कलम २ च्या खंड (घ) मध्ये जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल;

(ड) "सदस्य" याचा अर्थ, जी कोणत्याही समाजाची सदस्य आहे अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे;

(च) "सामाजिक दक्षता अधिकारी" याचा अर्थ, राज्य शासनाने, कलम १६ अन्वये राजपत्रातील अधिसुचनेव्दारे पदनिर्दे शित केलेला, शासनाचा कोणताही वर्ग वअधिकारी, असा आहे;

(छ) "सामाजिक बहिष्कार" याचा अर्थ, समाजाच्या सदस्यांमध्ये कोणताही सामाजिक भेदभाव करणारी, कलम ३ मध्ये विनिर्दिष्ट केलेली कृती किंवा कृत्य-मग ते मौखिक किंवा लेखी स्वरूपातील असो-असा आहे;

(ज) "बळी पडलेली व्यक्ती" याचा अर्थ, ज्या कोणत्याही व्यक्ती विरूध्द जातपंचायतीने बेकायदेशीरपणे केलेली कार्यवाही ही समाज बहिष्कृत केल्याचा परिणामी शारीरीक, मानसिक, मनोवैज्ञानिक, भावनिक, शैक्षणिककिंवा आर्थिक हानी अथवा त्याच्या मालमत्तेची हानी सोसावी लागलेली असेल किंवा अनुभवावी लागलेली असेल, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे, आणि त्यामध्ये, तिचे नातेवाईक, कायदेशीर पालक व कायदेशीर वारस यांचा समावेश होतो;

(२) या अधिनियमामध्ये वापरण्यात आलेले परंतु व्याख्या न केलेले आणि भारतीय दंड सहिता, भारतीय साक्षी पुरावा अधिनियम, १९७२, फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३, किंवा यथास्थिती, मानवी हक्क संरक्षण अधिनियम, १९९३, मुंबई

पोलीस कायदा १९५८, जादुटोणा विरोधी कायदा २०१३, यांमध्ये व्याख्या केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमांमध्ये अनुक्रमे जे अर्थ नेमुन दिलेले असतील तेच अर्थ असतील.

सामाजिक बहिष्कार ३. जी कोणतीही सदस्य सदस्यांचा समूह कींवा सदस्यांच्या समूहावर पुढीलपैकी कोणतेही कृत्य किंवा कृत्ये करील त्याने आपल्या स्वतःच्या समाजातील सदस्यावर सामाजिक बहिष्कार टाकला असल्याचे मानण्यात येईलः-

(एक) जर तो, आपल्या स्वताःच्याच समाजातील कोणत्याही सामाजिक किंवा धार्मिक रूढी किंवा विधी यांचे पालन करण्यास अथवा सामाजिक, धार्मिक किंवा सामूहिक कार्यक्रम, प्रार्थना सभा, समाज मेळावा, सभा किंवा मिरवणूक यांमध्ये सहभागी होण्यास आडकाठी करण्यास लावील;

(दोन) जर तो, त्याच्या स्वतःच्या समाजातील सदस्य नित्य व सर्वसाधारणपणे जे विवाह, अंत्यविधी किंवा इतर धार्मिक समारंभ आणि विधी संस्कार असे विवाह, अंत्यविधी किंवा इतर धार्मिक समारंभ आणि विधी पार पाडण्याचा अधिकार त्यांच्या समाजातील कोणत्याही सदस्याचा नाकारील, किंवा नाकबूल करील अथवा तो नाकारण्यास किंवा नाकबूल करण्यास लावील;

(तीन) जर तो, कोणत्याही कारणांवरून सामाजिक बहिष्कार टाकील किंवा टाकण्यास लावील;

(चार) जर तो, आपल्या स्वताःच्याच समाजातील कोणत्याही सदस्याचे जगणे दुःखीकष्टी होईल अशा त-हेने त्या सदस्याला त्या समाजामध्ये सहभागी करून घेण्यास टाळाटाळ करील अथवा नकार देईल किंवा अशा सदस्याशी असलेले सामाजिक किंवा व्यावासायिक सबंध तोडील;

(पाच) जर तो, त्याच्या स्वतःच्या समाजासाठी आणि त्या समाजाच्या वतीने धर्मादाय, धार्मिक किंवा सार्वजनिक प्रयोजनांसाठी वापरात असणारी किंवा वापरण्याचा उद्देश असलेली जागा, जी, त्याच्या स्वताःच्या समाजाकडून, अशा समाजाच्या निधीतुन, पुर्णतः किंवा अंशतः स्थापन केलेली असेल किंवा जिचे परिक्षण करण्यात येत असेल आणि जी त्याच्या स्वताःच्या

समाजातील इतर कोणत्याही सदस्याला किंवा सदस्याच्या वापरासाठी सामान्यतः उपलब्ध असेल अशा कोणत्याही जागेत प्रवेश करण्यास किंवा वापर करण्यास प्रतिबंध करील किंवा आडकाठी करील अथवा प्रतिबंध करण्यास लावील किंवा आडकाठी करण्यास लावील;

(सहा) जर तो, आपल्या स्वतःच्याच समाजाकडून वापरण्यात येणारी, किंवा वापरण्याचा उद्देश असलेली, अथवा त्याच्या समाजाच्या लाभाकरीता असलेली, कोणतीही शाळा, शैक्षणिक संस्था, वैदयकीय संस्था, समाज मंदिर, विहार दालन (क्लब हॉल), स्मशानभूमी, दफनभूमी, यात किंवा इतर कोणत्याही जागेत आपल्या समाजातील सदस्याला प्रवेश करण्यास अथवा त्या सुविधांचा वापर करण्यास प्रतिबंध कराल किंवा आडकाठी करण्यास लावील;

(सात) जर तो, त्याच्या समाजाच्या फायदयासाठी निर्माण करण्यात आलेल्या एखादया धर्मादाय विश्वस्तव्यस्थेअंतर्गत अथवा वक्फअंतर्गत कोणताही लाभ घेण्यापासून त्याच्या स्वतःच्या समाजातील कोणत्याही सदस्यास प्रतिबंध करील किंवा आडकाठी करण्यास लावील;

(आठ) जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही इतर सदस्याशी अथवा सदस्यांशी असलेले सामाजिक, धार्मिक, व्यावसायिक किंवा व्यापारविषयक संबध तोडून टाकण्यास आपल्या समाजातील कोणत्याही सदस्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे चिथावणी देईल किंवा त्याला प्रक्षोभित करील किंवा प्रोत्साहन देईल;

(नऊ) जर तो, त्याच्या समाजाच्या सदस्यांसाठी सर्वसाधारणपणे खुल्या असलेल्या कोणत्याही उपासना स्थळी किंवा तीर्थस्थळी प्रवेश करण्यास, तेथे निवास करण्यास किंवा त्याचा अन्यथा वापर करण्यास आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याला प्रतिबंध करील किंवा आडकाठी करील अथवा प्रतिबंध करण्यास लावील किंवा आडकाठी करण्यास लावील;

(दहा) जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याला, त्याने समाजातील इतर सर्वसाधारणपणे जे सामाजिक,

व्यवसायिक किंवा व्यापारविषयक सबंध प्रस्थापित केले असते किंवा राखले असते असे संबंध ठेवण्यास प्रतिबंध करील किंवा आडकाठी करील अथवा प्रतिबंध करण्यास लावील किंवा आडकाठी करण्यास लावील;

(अकरा) जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही मुलांना समाजातील विशिष्ट कुंटुंब किंवा कुटुंबे यांतील मुलांबरोबर एकत्रित खेळण्यास प्रतिबंध करील किंवा आडकाठी करील अथवा प्रतिबंध करण्यास लावील किंवा आडकाठी करण्यास लावील;

(बारा)जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याला, मानवी हक्का उपभोगण्यास आडकाठी करील किंवा त्याबाबत नकार देईल अथवा आडकाठी करण्यास लावील किंवा नकार देण्यास लावील;

(तेरा)जर तो,नित्तीमत्ता, सामाजिक स्वीकृती, राजकीय कल, लैंगिकता यांच्या आधारे किंवा इतर कोणत्याही कारणाच्या आधारे समाजातील सदस्यांमध्ये भेदभाव करील किंवा भेदभाव करण्यास लावील;

(चौदा) जर तो, आपल्या समाजातील कोणत्याही सदस्याला सांस्कृतिक अडथळा निर्माण करील किंवा तो निर्माण करण्यास लावील त्याला कोणत्याही विशिष्ट प्रकारचे कपडे परिधान करण्यास किंवा कोणत्याही विशिष्ट भाषेचा वापर करण्यास भाग पाडील;

(पंधरा)जर तो,आपल्या स्वताःच्या समाजातुन समाजातील कोणत्याही सदस्याला काढून टाकण्यास लावील; आणि

(सोळा) तो, यांसारखी इतर कोणतीही कृत्ये करील.

(सतरा)जातपंचानी जातीच्या व्यक्तीसाठी, समूहासाठी किंवा अन्य जातीच्या समूहाच्या व्यक्तींसाठी नियम बनविणे, न्यायनिवाडे करणे, दंड करणे, खुशालीच्या नावाखाली पैसे घेणे, शिक्षा करणे बहिष्कृत करने अशा प्रकारे जात परंपरा आणि रितीरिवाज यांचा आधार घेऊन छूपी अगर प्रकट समातंर न्याय व्यवस्था निर्माण करणे.

(अठरा)समाजातील व्यक्तींनी प्रथा परंपरा, रितीरिवाज मोडले असे सांगून आर्थिक, शारीरीक आणिमानसिक फसवणूक करणे.

(एकोणीस)प्रेताला खांदा देण्यापासून इतरांना रोखणे, समाज बांधवाना तेथून पळवून लावणे, प्रेतयात्रा रोखणे, प्रेताला दंड करणे वत ी रक्कम नातेवाईकांकडून वसूल करणे अथवा त्यासाठी छळ करणे, मयताच्या विविध विधीमध्ये दारू व मटनाची सक्ती करणे. ंमयताचे विविथ विधी न केल्याने बहिष्कृत करणे.

(वीस)बहिष्कृत केलेल्या व्यक्तीसोबत बोलल्याने बोलणा-यास बहिष्कृत करणे अथवा दंड करणे.मुलभूत अथवा सार्वजनिक सोई च्या वापरावर बंदी करणे.

(एकवीस)जातीत परत घेण्यासाठी अनिष्ठ, अघोरी प्रथांचा अवलंब करण्याची जबरदस्ती करणे.

(बाविस)जनावरांना जाणिवपुर्वक एकत्र येण्यापासून रोखणे, त्यांना एकत्र चरण्यास अथवा पाणी पिण्यास बंदी आणणे.

(तेविस)यात्रा-जत्रा मध्ये सहभागी होण्यापासून रोखणे, देवाची पालखी जाणिवपुर्वक दारावरून न नेणे, जातीवर आधारीत व्यवसाय करण्याची सक्ती करणे व नकार दिल्यास आर्थिक, मानसिक त्रास देणे अथवा बहिष्कृत करणे.

(चोविस)देवाची शपथ देऊन एखादया व्यक्ती अथवा राजकीय पक्षाला मतदान करण्याची सक्ती करणे, मतदानापासून रोखणे, निवडणूकीपासून रोखणे विशिष्ट उमेदवाराला विजयी करण्याचा जातीच्या लोकांसाठी फतवा काढणे व विशिष्ट उमेदवाराचा प्रचार करणे भाग पाडणे अथवा दबाव आणणे.

(पंचविस)सार्वजनिक कार्यक्रमासाठी पैसे न दिल्यास त्याचा मानसिक छळ करणे अथवा बहिष्कृत करणे. एखादयाच्या लग्नात सहभागी न होण्याचा तोंडी अथवा लेखी फतवा काढणे अथवा जबरदस्ती करणे. ळाग्न इतर कार्यक्रमात एखादयाला टिळा न लावणे अथवा एखादयास जाणिवपुर्वक अपमानास्पद वागणूक देणे. कार्यक्रमातुन बाहेर काढणे.

(सव्वीस)बहिष्कृत व्यक्तीला शेतीची साधने अथवा मजुर मिळण्यापासून रोखणे. उत्पादित माल खरेदी विक्री करण्यापासून रोखणे.

(सत्तावीस)पंचानी बोलावलेल्या बैठकीस उपस्थित न राहिल्याने बहिष्कृत करणे, सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी न झाल्याने बहिष्कृत करणे.

(अठ्ठावीस) पंचानी ठरवून दिलेले रितीरिवाज मोडले, कोणते कपडे अंगात घालावे याची सक्ती असतांना वेगळा पेहराव केला म्हणून मानसिक त्रास देणे. अन्न-पाणी रोखणे अथवा बहिष्कृत करणे.

(एकोणतीस)विविध कार्यक्रमात गावजेवण, मटण, दारू देण्याची जबरदस्ती करणे न दिल्यास छळ करणे, बहिष्कृत करणे.

२१. एखादया ठिकाणी नोकरी-व्यवसाय करणे अगर नकरण्याची सक्ती करणे. एखादया ठिकाणी रहाण्याची अथवा न राहण्याची सक्ती करणे.

(तीस)पंचाना त्यांच्या संस्था, मंडळे, संघटनांच्या कारभाराबाबत हिशोब विचारल्यास मानसिक व शारीरीक छळ करणे.

(एकतीस)समाजातील अथवा अन्य समूहातील व्यक्तींच्या मालमत्तेचा अपहार करणे.

(बत्तीस)बाळ पोटात असतांना, पाळण्यात, अल्पवयीन लग्न लावने. लग्न लावनेची जबरदस्ती करणे. जन्मापासून मृत्यूपर्यंतचे सर्व विधी व कार्यक्रम पंचाच्या उपस्थितीत करण्याची जबरदस्ती करणे.

(तेहत्तीस)समाजातील लग्न ठरवताना पाच कुळांच्या तपासातील खोट(गुन्हा, कलंक, वैरभाव, गोत्र, पोटजात, बोलीभाषा, प्रांतवाद)दाखवत लग्न फेटाळून लावणे. अथवा लग्न जमविण्यासाठी खुशालिच्या नावाखाली पैशांची जबरदस्ती

करणे.लग्नात मटन, दारू, खुशाली न दिल्यास मानसिक छळ करणे.

(चौतीस)समाजातील मुला मुलीने विना परवाणगी विवाह केल्यास अथवा आंतरजातीय विवाह केल्यास मारहाण करणे.जीव घेणे, अथवा जीव घेण्यासाठी प्रवृत्त करणे, विवाहीत मुला-मुलींच्या नावाने मयताचे विधी घालण्यासाठी परिवारास जबरदस्ती करणे, त्यांच्याशी संबंध तोडण्यासाठी जबरदस्ती करणे.

(पस्तीस)महिलेला पवित्र सिध्द करण्यासाठी उकळत्या तेलात हात घालण्यासाठी जबरदस्ती करणे, न्यायनिवाडयाच्या नावाखाली तोंडात तांदुळ चघळण्यास देत त्याच्या आधारे आरोपी जाहिर करणे, झाडाची पाने हातावर ठेवून त्यावर तप्त केलेली कु-हाड ठेवणे. पाण्याची घागर डोक्यावर ठेवून एका दमात डोंगर चढणे किंवा अशाच प्रकारच्या अंधश्रध्देवर आधारीत, आघोरी व अनिष्ट न्यायनिवाडे करणे.

(छत्तीस)लग्न झाल्यावर मुला-मुलीने पांढ-या वस्त्रावर झोपून त्यावर रक्ताचा डाग असल्यास लग्न ग्राहय धरण्याची कौमार्य परिक्षा करण्यासाठी अवलंब करण्याची जबरदस्ती करणे.

(सदोतीस)परपुरूषाच्या स्पर्शाने महिला बाटल्याने जात भ्रष्ट केल्याचे सांगून तीला उपचारापासून रोखणे, तीची शारीरीक आर्थिक, मानसिक फसवनूक करणे.

(अडोतीस)जातपंचायत बसवून महिलांना तोंडी घटस्फोट देणे, पेपेरवर घटस्फोट करणे, रूमाल फाडून घटस्फोट करणे, जबरदस्तीने घटस्फोट करणे, महिलांच्या पुर्नविवाहास अडसर आणणे.

(एकोणचाळीस)मुलींना, बालकांना एकत्र येण्यापासून रोखणे, मुलींना शिक्षण घेण्यापासून रोखणे, इतर समाजात सहभागी होण्यापासून रोखणे.

(चाळीस)अत्याचार ग्रस्त महिलेस, परपुरूषाच्या स्पर्शाने बाटली असे सांगून तीचा छळ करणे.परपुरूषाच्या स्पर्शाने महिला बाटते असे सांगून वैद्यकीय उपचारांपासून रोकणे, बाळंतपण घरीच करणेची सक्ती करणे.

(एक्केचाळीस)लग्न झालेल्या महिलेने जातीच्या बोलीभाषेत नबोलता अन्य भाषेत बोलण्यास घटस्फोटाची सक्ती करणे.

(बेचाळीस) जातीतील व्यक्तींना पोलीसात अथवा न्यायालयात जाण्यापासून रोखणे.
वरील सर्व बाबी व त्या सदृश्य अन्य बाबी.

४. पिडीत व्यक्तीस संरक्षण, तातपुरते पुर्नवसन नुकसान भरपाई राज्य सरकार करेल.

५. (१) कोणातीही व्यक्ती किंवा व्यक्तींचा समूह, समाजाच्या कोणत्याही सदस्यावर जातपंचायतीची बेकायदेशीर कार्यवाही लादण्याच्या हेतुने किंवा उद्देशाने विचारविनिमय करण्यासाठी कोणत्याही वेळी आणि कोणत्याही ठिकाणी एकत्रित होणार नाहीत, एकत्र जमणार नाहीत किंवा एकत्र येणार नाहीत.

(२)अशा रीतीने एकत्रित होणे किंवा एकत्र जमणे किंवा एकत्र येणे यास, बेकायदेशीर जमाव म्हणून समजण्यात येईल आणि असा जमाव बोलावणारी व तो आयोजित करनारी प्रत्येक व्यक्ती आणि त्यामध्ये सहभागी होणारा प्रत्येक सदस्य हा एक लाख पन्नास हजार रूपयांपर्यंत असू शकेल एवढया द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र होईल.
६. जातपंचायतीची बेकायदेशीर कारवाई याव्दारे बंदी घालण्यात येत असून ते करणे हा, अपराध ठरेल.

७.जो कोणी आपल्या स्वताःच्या समाजातील सदस्यावर कोणतीही जातपंचायतीची बेकायदेशीर कारवाई करेल किंवा सामाजिक बहिष्कार घालील किंवा घालण्यास लावील, त्यास, अपराध सिध्द झाल्यानंतर कमीतकमी सहा महिने व जास्तीत जास्त सात वर्षा

पर्यंत कारावासाची शिक्षा असेल व कमीत कमी१ लाख व जास्तीत जास्त १0 लाख रूपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची, शिक्षा होईल, किंवा, या दोन्ही शिक्षा होतील.

**स्पष्टीकरणः-** जेव्हा या कलमाखाली अपराध जात पंचायतीने केला असल्याचे अभिकथन करण्यात आले असेल तेव्हा, जर असा अपराध, अशा जातपंचायतीच्यासभेमध्ये केला असल्याने अभिकथन केले असेल तर, जिने अशा सभेमध्ये घेण्यात आलेल्या सामाजिक बहिष्काराबाबतच्या निर्णयाच्या बाजुने मत दिले असेल किंवा जो त्यासंबधीचा निर्णय करण्यात सहभागी झाली असेल अशा कोणत्याही व्यक्तीने तो अपराध केला असल्याचे मानण्यात येईल.

८. जी कोणी व्यक्ती, या अधिनियमाखालील अपराध करण्यास सहाय्य करील किंवा अपराध करण्यास अपप्रेरणा देईल अशा प्रत्येक व्यक्तीस, जास्तीत जास्त पाच वर्षापर्यंत व कमीत कमी तीन वर्षापर्यंत शिक्षा असू शकेल इतक्या कारावासाची किंवा जास्तीत जास्त तीन लाख रूपयांपर्यंत व कमीत कमी एक लाख पर्यंत असू शकेल द्रव्यदंडाची, शिक्षा होईल, किंवा, या दोन्ही शिक्षा होतील.

९. (१) हा अधिनियम अंमलात येण्यापुर्वी, जर कोणत्याही व्यक्तीवर सामाजिक बहिष्कार रद्दबातल आणि निष्प्रभावी ठरेल.

(२) जी कोणतीही जातपंचायतः-

(क) या अधिनियमान्वये रद्दबातल ठरलेला सामाजिक बहिष्कार अंमलात असल्याने घोषित करील; किंवा

(ख) सामाजिक बहिष्कार घातलेल्या व्यक्तीच्या बाबतीत असा सामाजिक बहिष्कार अद्याप अंमलात आहे असे दर्शविण्यासाठी अशा रीतीने वर्तन करील,

तेव्हा, अशा कोणत्याही जातपंचायतीने, या अधिनियमाच्या तरतुदींखालील अपराध केला असल्याचे मानण्यात येईल आणि ती तद्नुसार शिक्षा होण्यास पात्र असेल.

१०. जर आरोपीस दोषी ठरविले असेल तर, न्यायालय, शिक्षेच्या प्रश्नाबाबत, बळी पडलेल्या व्यक्तीचे म्हणणे ऐकून घेईल आणि त्यानंतरच शिक्षा ठोठावतील.

११. अधिकार कक्षा

(१)बळी पडलेली व्यक्ती वा कुटुंब कायमस्वरूपी किंवा अस्थायीरीत्या ज्या ठीकाणी वास्तव्य करीत असेल, व्यवसाय किंवा नोकरी करीत असेल ते ठिकाण.

(२) जिथे गुन्हा घडला ती जागा.

१२. अपराध दखलपात्र व अजामीनपात्र असेल आणि तो महानगर दंडाधिकारी, किंवा यथास्थिति, न्यायदंडाधिकारीप्रथमवर्ग यांच्याकडून न्याय चौकशी करण्यायोग्य असेल.तसेच आरोपीस फौजदारी प्रक्रीया संहिता प्रमाणे अटक पुर्व जामिन घेता येणार नाही.

१३.(१) बळी पडलेल्या व्यक्तीस किंवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्यास न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग यांच्याकडे एकतर महानगर पोलिसांमार्फत किंवा थेट, तक्रार दाखल करता येईल.

(२) ज्या दंडाधिका-यासमोर पोट-कलम (१) अन्वये तक्रार दाखल केली असेल त्या दंडाधिका-यास, पोलिसांना अन्वेषण करण्याचे निदेश देता येतील.

(३) दंडाधिका-यास, बळी पडलेल्या व्यक्तीला व तिच्या कुटुंबाला प्रकरणाच्या न्यायचौकशीदरम्यान त्यास योग्य वाटेल असे कोणत्याही प्रकारचे सहाय्य किंवा उपाययोजना करण्यास किंवा संरक्षण देण्यास व तात्पुरता निवारा व्यवस्था करण्यासाठी प्राधिका-यांनाही निर्देश देता येतील.

१४. या अधिनियमान्वये सामाजिक बहिष्कार घालण्याच्या अपराधाची, किंवासामाजिक बहिष्कार टाकण्याची शक्यता असल्याची माहिती मिळाल्यानंतर, पोलीस अधिका-यास,-

(क) या अधिनियमाखालील कोणताही अपराध करण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही ठिकाणी कोणतीही अडचण किंवा अडथळा उभारण्यात किंवा रचण्यात आला आहे, असे वाटण्यास त्या पोलिस अधिका-याला वाजवी कारण असेल तर, अशा कोणत्याही ठीकाणी उभारलेली किंवा रचलेली ती कोणतीही अडचण किंवा अडथळा दुर करता येईल किंवा तो दुर करण्याची व्यवस्था करता येईल; किंवा

(ख) या अधिनियमाखालील अपराध करण्याच्या प्रयोजनार्थ कोणतेही व्दार किंवा दरवाजा बंद करण्यात आला आहे असे वाटण्यात त्या पोलीस अधिका-याला वाजवी कारण असेल तर, असे कोणतेही व्दार किंवा दरवाजा उघडता येईल किंवा तो उघडण्याची व्यवस्था करता येईल.

१५. जलदगतीने न्यायमिळविण्याची सुनिश्चीती करण्यासाठी, दोषारोपत्र दाखल केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत न्यायचौकशी पूर्ण करण्यात येईल.

१६. (१) जिल्हाधिका-यास, किंवा यथास्थिति, जिल्हादंडाधिका-यास सामाजिक बहिष्कार घालण्याकरीता बेकायदेशीर सभा बोलविण्याच्या शक्यतेबाबत माहिति मिळाल्यास त्याबाबतीत, तो, आदेशाव्दारे, त्यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्रांमध्ये, कोणतीही अशी बेकायदेशीर सभा बोलविण्यास आणि कोणत्याही व्यक्तीला या अधिनियमाखालील कोणतेही अपराधाचे कोणतेही कृत्य करण्यास मनाई करील.

(२) जिल्हाधिका-यास, किंवा यथास्थिति, जिल्हादंडाधिका-यास पोलीस अधिका-यांना योग्य निदेश देण्यासह, अशा आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी त्यास आवश्यक अशी उपाययोजना करता येईल.

१७. राज्य शासनास, राजपत्रातील अधिसुचनेव्दारे, त्यास आवश्यक वाटेल अशा शासनाच्या कोणत्याही अधिका-याला दक्षता अधिकारी म्हणून पदनिर्देशित करता येईल आणि तसेच, ज्या क्षेत्रात किंवा क्षेत्रांत या अधिनियमाव्दारे किंवा त्या अन्वये

त्याला प्रदान केलेले अधिकार तो वापरील व कर्तव्ये पार पाडील, अशी क्षेत्र किंवा क्षेत्रे अधिसूचित करता येतील.

१८. (१) दक्षता अधिका-याची कार्ये पुढीलप्रमाणे असतील:-

(क) त्याला योग्य वाटेल अशी कार्यवाही करून त्याच्या अधिकारक्षेत्रातील कोणत्याही व्यक्तीकडून या अधिनियमाच्या तरतुदींखालील अपराधांचा शोध घेणे व अशा प्रकरणांचा दंडाधिका-याला माहिती देणे;

(ख) या अधिनियमान्वये न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग अपरांधाची चौकशी व त्यांवर कार्यवाही करील त्यावेळी त्याला सहाय्य करणे;

(ग) याअधिनियमान्वये पोलीस अधिका-यांना, त्यांच्या कर्तव्यपालनात सहाय्य करणे;

(घ) आरोपीकडून, दंडाधिका-याने केलेल्या सामाजिक सवेच्या आदेशाची अंमलबजावणी होत आहे हे पाहणे व अशा आदेशाच्या अनुपालनासंबंधी अहावाल न्यायालयाला पाठविणे;

(ड) दंडाधिकारी व पोलीस अधिक्षक, किंवा यथास्थिती, पोलीस आयुक्त यांना आपल्या कामाबाबतचा त्रैमासिक अहवाल सादर करणे;

(च) राज्य शासनाकडून त्याला नेमून देण्यात येतील अशी इतर कार्ये पार पाडणे.

१९. जेव्हा दंडाधिकारी द्रव्यदंडाची शिक्षा लादील तेव्हा न्यायालयास, न्यायनिर्णय करतेवेळी, नुकसान भरपाई म्हणून वसूल करण्यात आलेल्या द्रव्यदंडाची संपुर्ण रक्कम किंवा त्या रक्कमेचा काही भाग बळी पडलेल्या व्यक्तीला किंवा तिच्या कुटुंबाला देण्यात यावा असा आदेश देता येईल.

२०. भारतीय साक्षी पुरावा अधिनियम .,१८७२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये शिक्षापात्र अपराधांची कोणतीही न्यायचौकशी करताना, या अधिनियमाखाली कोणताही अपराध आरोपीकडून घडलेला नाही याबाबतचा सिध्दभार हा त्या आरोपीवर असेल.

२१. या अधिनियमाच्या तरतुदी हया, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना पूरक असतील व त्या त्यांचे न्यूनीकरण करणा-या नसतील.

२२. या अधिनियमाखालील अपरांधाबद्दल दोषारोप ठेवताना, दंडाधिका-यास, भारतीय दंड संहिता, १९६० याची कलमे ३४, १२०क, १२०ख, १४९, १५३क, ३८३ ते ३८९ आणि ५११ यांच्या तरतुदींखालील किंवा त्या संहितेच्या इतर कोणत्याही तरतुदींखालील अपराध केल्याची वस्तुस्थिती उघड होईल तेव्हा, त्या कलमान्वये देखील दोषारोप ठेवता येतील.

२३.(१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राजपत्रातील अधिसुचनेव्दारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधिमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधीमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल , आणि ज्या अधिवेशनात किंवा अधिवेशनांमध्ये तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा ‸अधिवेशन समाप्त होण्यापुर्वी कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्याबाबत एकमत दोन्ही सभागृहांमध्ये एकमत झाले कींवा नियम करू नये म्हनून दोन्ही सभागृहांमध्ये एकमत झाले आणि त्यांनी तशा आशयाच्या आपला निर्णय, राजपत्रात प्रसिध्द केल्याच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिती, तो मुळीच अंमलात येणात नाही; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या वैधतेस बाधा येणार नाही.

२४. (१) या अधिनियमाच्या तरुतदींची अंमलबजावणी करतान कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, ती अडचण दुर करण्याच्या

प्रयोजनासाठी, आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही कृती करता येईल.

परंतु या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर या पोट-कलमान्वये असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२)पोटकलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.